## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

### अ प्रभाग समिती

### सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०४]

### (दिनांक १३/०८/२०१९ रोजीची तहकूब सभा)

दिनांक : 03/09/2019 वेळ : सकाळी 11.15 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे **ऑगष्ट 2019** ची मंगळवार दिनांक **13/08/2019** रोजीची सकाळी **11.30 वा.** ची तहकूब मासिक सभा दिनांक 03/09/2019 रोजी स.११.१५ वा.अ क्षेत्रीय कार्यालयातील **" राजमाता जिजाऊ सभागृह "** येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 4. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 5. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / माजी उपमहापौर |
| 6. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |
| 8. | मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू | महापालिका स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे, क्षेत्रिय अधिकारी. मा. श्री ज्ञानदेव जुंधारे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री प्रवीण लडकत-कार्यकारी अभियंता(स्थापत्य) पा.पु., मा.श्री अनिल थेऊरकर, प्र.प्रशासन अधिकारी, मा.श्री मोहन निकम -लेखाधिकारी, मा.श्री महादेव शिंदे, सहाय्यक आरोग्याधिकारी, मा. श्री चंद्रकांत मुठाळ-उपअभियंता(स्थापत्य), मा.श्री शिवाजी चौरे-उपअभियंता(स्थापत्य), श्री नरोटे सुनिल-उपअभियंता(स्थापत्य उदयान) मा.श्री मोहन खोंद्रे उपअभियंता(झोनिपु स्थापत्य), (झोनिपु स्थापत्य),श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य),मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियंता(ड्रेनेज), मा.श्री डी.एम.कुंभार-उपअभियंता(पाणी पुरवठा) मा.श्री पी.एम.गायकवाड-उद्यान अधिक्षक, श्री कोंढरे सुरेश-प्रशासन अधिकारी(अतिक्रमण),श्रीमती साळुंके अस्मिता-कनिष्ठ अभियंता-स्थापत्य उद्यान, श्री इनामदार एस.जी.-मुख्य् आरोग्य निरिक्षक, श्री मुगुटराव सावंत-अतिक्रमण निरिक्षक, श्री ढगे राजेंद्र-अतिक्रमण निरिक्षक,श्री लाडगे सतिश-अतिक्रमण निरिक्षक, श्री जी.आर.गोसावी.-सहाय्यक उदयान अधिक्षक-उदयान विभाग,श्री डी.जी.कांबळे-उद्यान सहाय्यक, बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक-मा.शर्मिला बाबर अनुमोदक-मा. केशव घोळवे

भारताचे माजी अर्थमंत्री कै.अरुण जेटली यांचे दिनांक २४/८/२०१९ रोजी दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून बैठक १० मिनिटांसाठी तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

---

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

सन्मा.सभापती - **बुधवार दिनांक ०३/०९/२०१९** रोजी स.११.२५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

---

यानंतर मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सभेचे कामकाज बुधवार दिनांक ०३/०९/२०१९ रोजी स.११.२५ वा सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

तद्नंतर दिनांक ३१/०७/२०१९ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा (**कार्यपत्रिका क्र.३**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

ठराव क्रमांक 12
दिनांक 03/09/2019
सुचक: मा. केशव हनुमंत घोळवे

विषय क्रमांक 01
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भः- सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ३१/०७/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील शाहूनगर परिसरामधील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी शिक्षण मंडळ समिती सभापती **"स्व्.कैलासभाऊ गंगाराम चांदगुडे"** यांचे नाव अमित कॉर्नर ते शिवशंभो चौक या मुख्य् रस्त्यावरील पदपथास देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच म्हाडा कॉलनी येथील कापसे उद्यानातील जेष्ठ नागरिक संघ व तेथील लगतच्या वास्तूला **"कै.एम.एस.नायर"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर वास्तूचे नूतनीकरण केले जाईल. नूतनीकरण केल्यानंतरसुध्दा **"कै.एम.एस.नायर"** हेच नामकरण ठेवावे या उपसूचनेसह मान्यता देणेत येत आहे.

<u>ठराव सर्वानुमते मंजुर झाला.</u>

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[शर्मिला राजू बाबर]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 118 /2019 दिनांक:- 05 /09 /2019

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रत,
सर्व संबंधित ----------------------